॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

**जळगाव दि.६ (प्रतिनिधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दिले जाणारे सन २०२४ चे उत्कृष्ट महाविद्यालये / परिसंस्था / प्राचार्य / शिक्षक / ग्रंथपाल / शारिरीक शिक्षण संचालक आणि उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार जाहीर झाले असून व्यावसायिक महाविद्यालये / परिसंस्था गटात चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी व नंदुरबार तालुका विधायक समितीचे गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार अव्यावसायिक महाविद्यालय गटात उत्कृष्ट महाविद्यालय ठरले आहे. हे पुरस्कार बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी विद्यापीठाने जाहीर केले.

**उत्कृष्ट महाविद्यालय, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व संशोधक पुरस्कार विजेते** पुढील प्रमाणे

**उत्कृष्ट महाविद्यालय / परिसंस्था - १)** महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, चोपडा **(व्यावसायिक)**, २) नंदुरबार तालुका विधायक समितीचे गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार **(अव्यावसायिक)**, **उत्कृष्ट प्राचार्य** – प्राचार्य डॉ. सुनील पवार (पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा), **उत्कृष्ट शिक्षक (महाविद्यालय)** – १) डॉ. शशिकांत वग्गे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव) २) डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे), **उत्कृष्ट शिक्षक (विद्यापीठ)** १) **प्रा.** सतीष कोल्हे (संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव), २) प्रा. प्रवीण पुराणिक (जैवशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव), **उत्कृष्ट अधिकारी (विद्यापीठ वर्ग -१ )** – नवलसिंग पाटील (उपकुलसचिव, प्रशासन विभाग), **उत्कृष्ट अधिकारी (विद्यापीठ वर्ग -२)** – शरद पाटील (सामान्य प्रशासन / रा.से.यो. विभाग), **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -३)** – १) भरत उफाडे (वरिष्ठ सहायक, गणितशास्त्र प्रशाळा), २) गिरीष पाटील (वरिष्ठ सहायक,वित्त विभाग), ३) संजू पाटील (सहायक, सामान्य प्रशासन विभाग), ४) जगदीश शिवदे (लघु लेखक (नि.श्रे.), रा.से.यो. व क्रीडा विभाग), **उत्तेजनार्थ :** ५) रवींद्र सोनवणे (डाटा एन्ट्री ऑपरेटर, संगणक केंद्र, परीक्षा विभाग), ६) अरवींद पाटील (वाहनचालक, सामान्य प्रशासन विभाग) **उत्कृष्ट कर्मचारी (विद्यापीठ वर्ग -४) १)** श्रीमती सविता पगारे (शिपाई, प्र-कुलगुरू कार्यालय), २) दिलीप कोचुरे (प्रयोगशाळा परिचर, बांधकाम), **उत्तेजनार्थ :** ३) श्रीमती प्रतिभा पवार (कुशल परिचर, संगणक शास्त्र प्रशाळा), ४) चंद्रकांत पाटील (कुशल परिचर, सामान्य प्रशासन विभाग), **दैनिक वेतनिक विद्यापीठ उत्तेजनार्थ** :१)दिनेश वाघ (अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष), २) नाना संदानशिव (पाणी पुरवठा विभाग), ३) निलेश सोनवणे (अतिथीगृह विभाग), **संलग्नित महाविद्यालय / परिसंस्था उत्कृष्ट अधिकारी (महाविद्यालय वर्ग -२)** –जितेश जाधव (रजिस्ट्रार, आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -३) -१)** दिनेश पाटील (सहायक ग्रंथपाल, महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे दादासाहेब सुरेश पाटील महाविद्यालय, चोपडा), २) हेमंत गायकवाड (प्रयोगशाळा सहायक, बी.पी. आर्टस, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव), ३) सौ. सोनल शहा (लिपीक, एच.आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ४) जितेंद्र चौधरी (वरीष्ठ लिपीक, संत जगनाडे महाराज शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य वरीष्ठ महाविद्यालय, खापर), **उत्कृष्ट कर्मचारी (महाविद्यालय वर्ग -४) - १)** कृष्णा गवळी (शिपाई, के.सी.ई.संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च जळगाव),२) मच्छिंद्र जाधव (प्रयोगशाळा परिचर, पाचोरा ता.को.ऑ.संस्थेचे शेठ मुरलीधरजी मानसिंगका कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा), ३) गणेश गोसावी (शिपाई, एच.आर. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर) , ४) कैलास सोलंकी (प्रयोगशाळा परिचर, सातपुडा शि.प्र.मंडळाचे वसंतराव नाईक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा)

विद्यापीठ शिक्षकांसाठी संशोधन पुरस्कार (प्रकाशन) : १) प्रा. जितेंद्र नाईक (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), २) डॉ. वंदना शिंदे (भौतिकशास्त्र प्रशाळा (कंत्राटी शिक्षिका)) ३) डॉ. विकास पाटील (रासायनिक तंत्रज्ञान संस्था), ४) डॉ. संजय घोष (भौतिकशास्त्र प्रशाळा) ५) प्रा. श्रीमती आर.एस. बेंद्रे, (रसायनशास्त्र प्रशाळा), ६)प्रा. एस.एन पाटील (पर्यावरणशास्त्र प्रशाळा),

महाविद्यालयीन शिक्षकांसाठी संशोधन पुरस्कार (प्रकाशन ) - १) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), २) डॉ. प्रकाश लभाणे (महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा), ३) डॉ. गणेश पाटील (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ४) डॉ. गुणवंत सोनवणे (किसान विद्या प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारोळा) ५) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर), ६) डॉ. पंकज जैन (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर) ७) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, शिरपूर),

८) डॉ. विनोदकुमार उगले (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), ९) डॉ. उज्वलदीप देवरे (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), १०) डॉ. हितेंद्र महाजन (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), ११) डॉ. अतुल शिरखेडकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), १२) डॉ. मोहन कळसकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), १३) डॉ. प्रवीण पाटील (एच.आर. पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर),

**संशोधन (स्वामित्वहक्क) पुरस्कार –**१) डॉ. सौरभ गणोरकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल, शिरपूर), २) डॉ. शैलेश चालिकवार (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), ३) डॉ. कैलास मोरावकर (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर)

**संशोधन (निधी) पुरस्कार :** १) डॉ. राहुल कुलकर्णी ( बी.पी. आर्टस, एस.एम.ए. सायन्स व के.के.सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगाव) २) डॉ. हारूण पटेल (आर.सी.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), ३) डॉ. राहुल ताडे (एच.आर.पटेल, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, शिरपूर), ४) डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे)

**उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार :** डॉ. तुषार पाटील (एसएसव्हीपीएसचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,शिंदखेडा)

**उत्कृष्ट संचालक शारीरिक शिक्षण पुरस्कार :** प्रा. गोविंद मारतळे (तापी परिसर विद्या मंडळ संचलित धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर)

वरील पुरस्कार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या समारंभात देण्यात येणार आहे. अशी माहिती डॉ. विनोद पाटील यांनी दिली .

## बातमी नं. २

**जळगाव दि.६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३४ व्या पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत त्यांनी दि. ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.**

विद्यापीठातर्फे ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ आणि एप्रिल/मे-२०२५ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि पीएच.डी. धारकांकरिता पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन पदवी / पदविका प्रमाणपत्र अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner-> Convocation -> 34th Convocation Ceremony -> या लिंकवर जाऊन आवश्यक माहिती भरावी. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाच्या आत पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ५००/- असून उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास रूपये १३००/- भरावे लागतील. तर विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत दि.१ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी केले आहे.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ६ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

## स्टार्टअप उद्योजकांसाठी सुवर्णसंधी! KCIIL मार्फत स्टार्टअप इन्क्युबेशनसाठी अर्ज आमंत्रित

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) : नाविन्यपूर्ण उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, तरुण उद्योजकांच्या संकल्पनांना दिशा देऊन त्यांना यशस्वी उद्योगांमध्ये रूपांतरित करणे, तसेच स्टार्टअप्सना स्थानिक व जागतिक बाजारपेठेत यशस्वीपणे उतरवण्यासाठी आवश्यक तांत्रिक, व्यावसायिक आणि सल्लागार सुविधा उपलब्ध करून देणे हा "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव" यांचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उद्देशाने स्थापन करण्यात आलेले "केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस" (KCIIL) हे उत्तर महाराष्ट्रातील एक प्रतिष्ठित व अग्रगण्य इन्क्युबेशन सेंटर असून, महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटी आणि Startup India यांच्या पाठबळाने अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. हे केंद्र नाविन्यपूर्ण कल्पनांना आवश्यक त्या सर्व सुविधा, आर्थिक सहाय्य, व्यावसायिक मार्गदर्शन आणि उद्योग क्षेत्रातील नेटवर्किंग संधी प्रदान करून त्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यास मदत करते. या केंद्रामार्फत कृषी व अन्न प्रक्रिया, सामाजिक नवोपक्रम, डिजिटल नवोपक्रम, आरोग्यसेवा व जैवतंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन तसेच अक्षय ऊर्जा/हरित ऊर्जा अशा विविध आणि उद्योजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या फोकस सेक्टर्समधील नवकल्पक व स्टार्टअप्सकडून अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत. या क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण उत्पादने, सेवा किंवा तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता असलेल्या उद्योजकांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आणि बाजारपेठेत यशस्वीरित्या सादर करण्यासाठी KCIIL मार्फत सहकार्य उपलब्ध होईल.

अर्जदारांसाठी पात्रता निकष पुढीलप्रमाणे आहेत – अर्जदाराकडे नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पना असावी, त्याने कार्यरत प्रोटोटाइप किंवा एमव्हीपी (Minimum Viable Product) विकसित करण्याची क्षमता असावी, व्यवसाय वृद्धीसाठी सज्ज असणे आणि गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचण्याची तयारी असणे आवश्यक आहे. तसेच, अर्जदार हा भारतीय नागरिक असावा.

निवड झालेल्या स्टार्टअप्सना / नवकल्पकांना मिळणारे लाभ –निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उद्योजकांना Startup India Seed Fund / MSInS Seed Fund अंतर्गत आर्थिक सहाय्याची संधी उपलब्ध होईल. याशिवाय, व्यवसाय विकासासाठी आवश्यक कोवर्किंग स्पेस, अत्याधुनिक तांत्रिक सुविधा, अनुभवी मेंटर्सकडून मार्गदर्शन, उद्योग व गुंतवणूकदारांशी नेटवर्किंगच्या संधी, तसेच कायदेशीर, आर्थिक, विपणन व बौद्धिक संपदा (IP) विषयक सल्ला दिला जाईल. याखेरीज, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक सहाय्य देखील पुरविले जाईल.

अर्ज QR द्वारे ऑनलाइन सादर करावेत. अधिक माहितीसाठी व अर्जासाठी KCIIL कार्यालयास प्रत्यक्ष भेट द्यावी किंवा ०२५७-२२५७४४८ या क्रमांकावर संपर्क साधावा. अर्ज करण्याची अंतिम तारीख: २० ऑगस्ट २०२५. स्टार्टअप्स/नवकल्पकांना आवाहन करण्यात येत आहे की, विद्यापीठात स्थित असलेल्या इनक्युबेशन सेंटरच्या सुविधा आणि सहकार्याचा जास्तीत जास्त लाभ घेऊन देशाच्या आर्थिक विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ६ ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता